जलताराच्या माध्यमातून भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे शाश्वत नियोजन : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. >>पान 2

अत्याधुनिक साधनांनी पोलिस दल सक्षम करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

लिंग निदानाचा होता प्रयत्न; वैधकीय अधिकारी भासवून महिलेची फसवणूक एक जण अटक >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 246 ■ शनिवार, दि. 19 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

ज्ञान हे कधीच पूर्ण होत नाही, ते नेहमी वाढवता येते.



'जर जाती व्यवस्था राहिलीच नाहीये म्हणता तर कशाचे ब्राह्मण?' फुले सिनेमाच्या वादावर अनुराग कश्यप काय म्हणाला?

आतील पान

## विविध योजनांच्या अंमलबजावणीतून

# शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणार - मुख्यमंत्री फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी : सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा कमी मोबदला मिळाला असल्याने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला होता. हा अन्याय दूर करण्यासाठी राज्य शासनाने या कालावधीतील सरळ खरेदीने संपादीत केलेल्या क्षेत्राकरीता पाच लक्ष प्रति हेक्टर दराने १६ हजार ६३३ हेक्टर क्षेत्राकरीता ८३१ कोटी ६७ लक्ष रुपये सानुग्रह अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिली असून ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा मिळाला असून यापुढेही विविध शेतीविषयक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.**

### विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ८३१.६७ कोटी रुपये सानुग्रह अनुदानाचे वितरण

अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात सानुग्रह अनुदानाचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सर्वश्री प्रताप अडसड, रवी राणा, केवलराम काळे,

>>पान २

# राज्यभरात व्हीआय नेटवर्कचा घोळ; युजर्सच्या हजारो तक्रारी!

**मुंबई/प्रतिनिधी :** देशभरात नावाजलेली व्हीआय या प्रमुख दूरसंचार कंपनीने भारतात टप्प्याटप्प्याने ५G सेवा सुरू केली आहे. मात्र आज पहाटे व्हीआयच्या ग्राहकांना नेटवर्कचा मोठा सामना करावा लागला. मुंबई, पुणे, दिल्ली येथील व्हीआय सिम धारकांना मोबाईल इंटरनेट, कॉलिंग, ऑनलाईन पेमेंट अशा आवश्यक सेवा वापरताना अनेक अडचणी सहन कराव्या लागल्या. सकाळ सकाळीच होणाऱ्या या समस्यांमुळे वापरकर्त्यांकडून तीव्र संताप व्यक्त होत असून नेटवर्कबाबत हजारो तक्रारी दाखल झाल्या आहेत.




नेमकं कारण काय?

शुक्रवारी पहाटे व्होडाफोन आयडियाच्या ग्राहकांना नेटवर्क खंडित झाल्याचा सामना करावा लागला, त्यामुळे दिल्ली एनसीआर, मुंबई आणि पुणे येथील वापरकर्त्यांना मोबाईल इंटरनेट वापरता येत नव्हते किंवा कॉल करता येत नव्हते. टेलिकॉम ऑपरेटरने तांत्रिक बिघाडामुळे हे व्यत्यय आल्याचे कंपनीने सांगितले. मात्र आता ही समस्या सोडवण्यात आली असून सर्व सेवा आता पूर्ववत करण्यात आल्या आहेत. दरम्यान, युजर्सना झालेल्या समस्यांबाबत कंपनीने दिलगिरी व्यक्त केली असून वापरकर्त्यांचे संयम आणि समजूतदारपणाबद्दल आभार मानले आहेत.

वापरत्यांच्या तक्रारींमध्ये वाढ डाउनडिटेक्टर आउटेज-ट्रॅकिंग प्लॅटफॉर्मनुसार, रात्री १२ वाजून ३० मिनिटांनंतर तक्रारी वाढू लागल्या आणि सुमारे १ वाजेपर्यंत १ हजार ८८० हून अधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या. अनेक वापरकर्त्यांनी सोशल मीडियावर निराशा व्यक्त केली आणि म्हटले की त्यांना वन-टाइम पासवर्ड (ओटीपी) मिळू शकले नाहीत, ज्यामुळे ऑनलाइन बँकिंगसारख्या आवश्यक सेवांवर परिणाम होत आहे. इतरांनी असे नोंदवले की त्यांचे डिव्हाइस रीस्टार्ट करून किंवा व्ही ॲप ॲक्सेस करण्याचा प्रयत्न करून समस्या सुटली नाही.







भाग ०२

# जिल्हा परिषद शाळेत जीर्ण झाले स्वच्छतागृह; विद्यार्थ्यांची होते कुचंबणा

## वरिष्ठांना चुकीची माहिती शाळांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव

## बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रकार : जीर्ण स्वच्छतागृह झाल्याचा धक्कादायक प्रकार

**डोणगाव : चिमुकले हे देशाचे भवितव्य असल्याने त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, क्रीडांगण यासह सर्वांगीण दृष्ट्या प्राथमिक सोयी - सुवधा उपलब्ध कराव्या, यासाठी शासनाच्या वतीने प्रत्येक शाळांना विशिष्ट प्रकारचा निधी उपलब्ध करून देत दिला जात आहे. या निधीतून प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध कराव्या, सोयी सुविधांचा अभाव असल्यास वरिष्ठांना कळवून त्याबाबत सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत नियोजन करावे, अशा सूचना प्रत्येक मुख्याध्यापकांना आहेत. मात्र, बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी यु-डायस मध्ये शाळांमध्ये स्वच्छतागृह,आहे असा अहवाल वरिष्ठांकडे सादर केला आहे.तर, शाळेत प्राथमिक सुविधांचा अभाव निर्माण झाला आहे. शाळेत जीर्ण झालेले स्वच्छता गृह आहेत. मुख्याध्यापकाकडून वरिष्ठांची दिशाभूल करण्याचा प्रकार.?. यु-डायस मध्ये वस्तुस्थिती मांडली असती तर, शाळेला प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची तरतूद करता आली असती. मात्र, या दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे शाळेला सुविधांपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.?**

बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १ ते ७ वर्ग असून १६० पटसंख्या आहे. चांगल्या प्रकारे विद्यार्थी संख्या असताना मात्र, या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधांचा अभाव आहे.मुख्याध्यापकांनी शाळेमध्ये स्वच्छालय असल्याचे वरिष्ठांना यु-डायस दिलेल्या नमूद असावे.प्रत्यक्षात मात्र, येथे पत्राच्या अर्थात टिन पत्राचे स्वच्छालय स्वच्छतागृह बनवण्यात आले आहे. त्याचबरोबर यु-डायस मध्ये स्वच्छतागृह असल्याची माहिती बरली असावी.? शासन दरबारी बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोयी-सुविधा असल्याचे नोंद असल्याने या ठिकाणी नव्याने स्वच्छतागृह उभारण्यासाठी करण्यासाठी निधीची तरतूद करता आली नसावी?. मुख्याध्यापकांनी शाळेची वस्तुस्थिती यु-डायस मध्ये मांडली असती तर, वरिष्ठांना सुद्धा या ठिकाणी स्वच्छतागृह प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी उपलब्ध करून देता आला किंवा पर्याय केला असता. मात्र, या चुकीच्या माहितीमुळे बेलगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांना सोयी - सुविधांपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. शाळेमध्ये सोयीसुविधांचा अभाव असताना मुख्याध्यापकांनी यु-डायस मध्ये शाळेमध्ये स्वच्छतागृह असल्याची नोंद मात्र का ? केली नसावी असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळीच असल्याचे चित्र समोर आले आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

### १६० विद्यार्थ्यांना एकच टिन पत्राचे स्वच्छतागृह

बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत १ ते ७ वर्ग असून तब्बल १६० विद्यार्थी संख्या आहे.या विद्यार्थ्यांना स्वच्छालय अथवा लघुशंका करण्यासाठी एकच टिन पत्राचे स्वच्छतागृह आहे.सर्व विद्यार्थ्यांना एकाच वेळी मधली सुट्टी होते.त्यामुळे एका स्वच्छतागृहावर स्वच्छता अथवा लघुशंका करण्यासाठी आपले काम भागवावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोयी होत आहे. एकीकडे शासन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टिकवण्यासाठी व शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मोठे प्रयत्न करीत आहेत. प्रत्यक्षात मात्र, शाळेतीलच मुख्याध्यापकाकडून वरिष्ठांना चुकीची माहिती दिल्या जात असल्याने शाळेत सोयी सुविधांचा अभाव निर्माण झाला आहे.आपला विदर्भ चे प्रतिनिधी गजानन जाधव यांनी बेलगाव येथील जिल्हा परिषद शाळेत भेट दिली असता त्या ठिकाणी स्वच्छतागृह येथील वस्तुस्थिती मात्र पाहता त्या ठिकाणी जीर्ण झालेले अवस्थेत स्वच्छतागृह दिसून आले.

बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधून माहिती घेतली असता शाळेमध्ये टीनपत्राचे स्वच्छतागृह आहे.यु-डायसनुसार स्वच्छतागृह इतर सुविधा बाबत अहवाल सादर करावे करणे आवश्यक आहे. शाळेत तब्बल १६० पटसंख्या व १ ते ७ वर्ग असताना केवळ एका स्वच्छतागृहाचा वापर केला जात आहे. तर, वार्षिक अहवालात याबाबत वरिष्ठांना माहिती दिली नाही की काय किंवा वरिष्ठांनी याकडे दुर्लक्ष केले आहे का ?असा प्रश्न निर्माण होत आहे.

एक स्वच्छतागृह आहे एक ची मागणी केली आहे. बेलगाव जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत एक स्वच्छतागृह आहे व एकची डिमांड केली आहे. पाणी व्यवस्था आहे बोरवेल आहे. पाणी फिल्टर आहे. अशी माहिती शाळेचे शिक्षक अजीम सर यांनी दिली आहे.

## उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

# जलताराच्या माध्यमातून भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे शाश्वत नियोजन : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

## अभियानात सहभागी नागरिकांचा सन्मान उत्साहात

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** जलतारा उपक्रम हे केवळ शासकीय योजनेचे रूप न राहता जनसहभागातून साकारलेली एक जलक्रांती आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला आणि स्वयंसेवी संस्था यांनी स्वप्रेरणेने या अभियानात सहभाग घेतला हे विशेष उल्लेखनीय आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्यासाठी सर्वांनी मिळून काम केल्यास आपण जलसंपन्नतेकडे नक्कीच वाटचाल करू शकतो. आजचा हा गौरव समारंभ म्हणजे या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे. या अभियानात सहभागी झालेल्यांचे कार्य प्रेरणादायी असून ते इतरांसाठी दिशादर्शक ठरेल.'' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी आपल्या मनोगतातून केले. जिल्ह्यातील जलसंधारण क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या



व्यक्ती व संस्थांचा यथोचित गौरव करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम व सत्कार समारंभ १६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस बोलत होत्या.

या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगचे डॉ. हरिष बाहेती, जलताराचे जनक पुरूषोत्तम वायाळ हे मान्यवर उपस्थित होते. याशिवाय अनंत देशमुख, पतंजलीचे भागवत, श्री सारडा, नारीशक्ती फाउंडेशनच्या श्रीमती इंगोले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचीही प्रमुख उपस्थिती होती.

'जलतारा' उपक्रमात स्वतःहून व स्वखर्चाने जलतारे व शोषखड्डे तयार करणाऱ्या शेतकऱ्यांचा, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आणि स्वयंसेवी संस्थांचा सन्मान करण्यात आला. विशेषतः महिलांचा जलसंधारणात असलेला सहभाग अधोरेखित करत त्यांचाही यथोचित गौरव करण्यात आला.स्वयंसेवी संस्था व सामाजिक योगदानाची दखल : आर्ट ऑफ लिव्हिंग, 'तिफन फाउंडेशन', 'नारीशक्ती फाउंडेशन', 'पतंजली' यांसह अनेक संस्थांनी जलतारा चळवळीत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.सहभागी व्यक्ती आणि संस्थांची यादी 'जलतारा डिस्ट्रिक्ट ग्रुप'वर शेअर करण्यात आली होती, ज्यामुळे कार्यक्रम अधिक सुसंगतपणे पार पडला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) कैलास देवरे यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने पार पाडले. कार्यक्रमाच्या माध्यमातून जलसंधारणाची चळवळ केवळ सन्मानापुरती मर्यादित न राहता भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे शाश्वत नियोजन करण्याची जाणीव प्रत्येक सहभागीच्या मनात रूजवण्यात आली.यावेळी उत्साहाचे वातावरण होते.

### पत्रकार परिषद तथा पत्रकारांचा सन्मान

जिल्ह्यातील जलसंधारण क्षेत्रात प्रभावी ठसा उमटवणाऱ्या 'जलतारा' उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण पत्रकार परिषद १६ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली. या पत्रकार परिषदेच्या निमित्ताने 'जलतारा' उपक्रमाचे वृत्तांकन केल्यामुळे उपस्थित पत्रकारांचा प्रोत्साहनपर सत्कारही जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. व उपस्थित मान्यवरांनी यावेळी केला.

# पीकविमा न मिळाल्यास विमा कंपनीला घेराव घालणार

## पिकविम्यासाठी लोणी बु येथील शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात राज्यातील शेतकऱ्यांना मिळणारा पिकविम्या संदर्भात अनेक लोकप्रतिनिधींनी विधानभवनात आवाज उठवला यावर सरकारने राज्यातील ११ जिल्ह्याचा पीकविमा मंजूर करत विमा कंपनीला शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सन २०२३ मधील खरीप हंगामातील पिकांचा पीकविमा जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला असून त्यांची संख्या तोकडी आहे.रिसोड तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांच्याकडे पीकविमा मिळण्यासाठी आपले निवेदन ता.१५ रोजी सादर केले आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, महाराष्ट्रातील बहुतांश कुटुंबे अजूनही शेतीवर अवलंबून आहेत. परंतु शेती हा व्यवसाय पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्याने, तो अत्यंत जोखमीचा ठरतो आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पूर, रोगराई अशा विविध नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते. या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सुरक्षा कवच देण्यासाठी पीक विमा योजना अस्तित्वात आली. या योजनेमुळे नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळते, ज्यामुळे त्यांना पुन्हा शेती करण्यासाठी मदत व्हावी परंतु विमा कंपन्या शेतकऱ्यांना नुकसान होऊनही पुरेशा प्रमाणात मदत करत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.रिसोड तालुक्यातील काही शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला असून अनेक शेतकऱ्यांना अद्यापही पीकविमा मिळाला नसल्याने शेतकरी द्विधा मनस्थितीत सापडले आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांना अद्यापही पीकविमा मिळाला नाही त्यांना तत्काळ पीकविमा मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर मच्छिंद्र पराडे,अनिल गणेशराव बोडखे,अशोक काकाराव बोडखे, पांडुरंग राऊत,सतीश राऊत,श्रीधर शिवाजी देशमुख विठल गोविंदा चौगुले,संतोष नवले,बालाजी नानाभाऊ बोडखे प्रल्हाद भाऊराव बोडखे,वैजनाथ राऊत आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### शेतकऱ्यांमध्ये संभ्रम

जिल्ह्यामधे काही शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला असून असंख्य शेतकरी पिकविम्यापासून अद्यापही वंचित आहेत.तसेच ज्या शेतकऱ्यांना विम्याच्या रक्कमा जमा झाल्या आहेत.त्या कोणत्या वर्षाचा आहे कोणत्या पिकाचा आहे.याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे.प्रशासनाने तसेच विमा कंपन्यांनि विमापात्र शेतकऱ्यांच्या याद्या सोशल मीडियावर प्रसिद्ध केल्यास शेतकऱ्यांना समजण्यास मदत होईल.




पान १ वरून...

# विविध योजनांच्या अंमलबजावणीतून

प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश यावलकर, संजय कुटे, श्रीमती कैकई डहाके, माजी आमदार प्रवीण पोटे पाटील तसेच विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक तथा अध्यक्ष मनोज चव्हाण आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा अत्यल्प मोबदला मागील सरकारने शेतकऱ्यांना दिला होता. तर २०१३ नंतर भुसंपादन केलेल्या जमीनीचा चारपट मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना देण्यात आला. ही खूप मोठी तफावत, झालेला अन्याय दूर सारण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलने केली. आमदार प्रताप अडसड यांनी सुध्दा याविषयी सातत्याने पाठपुरावा केला. अन्याय झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सन २०१४ मध्ये स्थापित नवीन सरकारने याबाबत कायदेशीर सल्ला मिळविला. यावर मार्ग काढण्यासाठी बैठकीत कसोशीने प्रयत्न करण्यात आले. कायद्याचे मार्ग बंद झाल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सानुग्रह अनुदानाचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. आज निधी वाटपाचा शुभारंभ माझ्या हस्ते होत आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट असून याबाबत मी समाधानी आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, अन्याय करणारा कायदा बदलविला तरच संबंधितांना न्याय मिळवून दिला जाऊ शकतो. संघटनेचे अध्यक्ष यांनी मांडलेल्या मागणीनुसार मृद व जलसंधारण विभागाने अधिग्रहीत केलेल्या जमीनीसाठी शासन निर्णयात सुधारणा करुन संबंधितांना मोबदला मिळवून दिला जाईल. प्रकल्पग्रस्तांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापित करुन बीज भांडवल उपलब्ध करुन दिल्या जाईल, ज्यातून ते छोटा मोठा उद्योग सुरु करु शकणार. प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण वाढविण्यासंदर्भात सर्व बाबी तपासून योग्य निर्णय घेण्यात येईल. प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधा पुरविण्यात येणार. २००६ ते २०१३ दरम्यानच्या भुसंपादीत शेवटच्या प्रकल्पग्रस्ताला लाभ मिळेपर्यंत योजना बंद होणार नाही. विदर्भात अनेक प्रकल्पांसाठी भुसंपादन करण्या आले आहे, संबंधित प्रकल्पग्रस्तांना टप्प्या टप्प्याने अनुदान दिल्या जाणार आहे. अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा करण्यासाठी कोणत्याही भुलथापांना बळी पडू नका, प्रत्येकाची अनुदानाची रक्कम विभागाव्दारे संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.शेतकरी हा राज्याचा पोशींदा आहे. त्यानुसार शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी राज्य शासनाकडून आगामी काळात विविध महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. बळीराजा नवसंजीवनी योजनेतून प्रकल्प उभारण्यात येणार आहे. पुढील काळात वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आनंददायी होणार आहे. यातून सुमारे ६०० किमीची नदी निर्माण करण्यात येणार असून पश्चिम विदर्भातील पाच जिल्हे तर पूर्व विदर्भातील सात जिल्ह्यांना शाश्वत सिंचनाची सोय होणार असून १० लाख हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसाला बारा तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी व्हॅल्यू कस्टर निर्माण करण्यात येणार याव्दारे टेक्सटाईल उद्योग भरभराटीस येईल. नानाजी देशमुखा कृषी संजीवनी योजनेतून शेती व शेतीपुरक उद्योगांसाठी खते, निविष्टा व यांत्रिकीकरणासाठी ६ हजार कोटी निधी दिला जाणार आहे. यातून प्रत्येक गावांचा व तेथील शेतजमीनीचा सर्वांगिण विकास साधला जाईल. शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला जाणार असून गावातील स्थानिक संस्था बळकट करण्यासाठी वर्ल्ड बँकेकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल. ॲग्रीस्टॅक योजनेतून ९६ लाख शेतकऱ्यांच्या जमीनीचे डिजीटलायझेशन करण्यात आल्याने पीक पाहणी, जमीन मोजणी इत्यादी कामे सॅटेलाईटव्दारे नोंदणी केली जात आहे. गटशेती, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देवून विषमुक्त शेतीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांचे जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. प्रकल्प निर्मितीसाठी ज्यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्यात त्यांना वेळेत मोबदला मिळवून देणे हे राज्य शासनाचे काम आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पाच लक्ष रुपये प्रति हेक्टरप्रमाणे सुमारे ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदान संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येणार. शेतकऱ्यांचे हिताच्या दृष्टीने मुख्यमंत्री महोदयांनी हा एक क्रांतीकारी निर्णय घेतला आहे, असे पालकमंत्री बावनकुळे व जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी आपल्या भाषणात सांगितले.सानुग्रह अनुदानाचा सातत्याने पाठपुरावा केल्याप्रित्यर्थ धामणगाव रेल्वेचे आमदार प्रताप अडसड आणि विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### 'जर जाती व्यवस्था राहिलीच नाहीये म्हणता तर कशाचे ब्राह्मण?' फुले सिनेमाच्या वादावर अनुराग कश्यप काय म्हणाला?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता आणि दिग्दर्शक अनुराग कश्यप त्याच्या रोखठोक वक्तव्यांसाठी ओळखला जातो. तो काही मुद्यांवर त्याची मतं स्पष्टपणे मांडत असतो. दरम्यान, आता अनुरागचं एक वक्तव्य पुन्हा चर्चेत आलंय. गेल्या काही दिवसांपासून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित सिनेमाची देशभर चर्चा आहे. या सिनेमात प्रतिक गांधी हा महात्मा फुले यांची भूमिका साकारणार आहे. महात्मा फुले यांच्या चरित्रावर आधारित सिनेमा त्यांच्या जयंतीदिवशी म्हणजे ११ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, ब्राह्मण महासंघाने विरोध केल्यानंतर सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली होती. आता हा सिनेमा २५ एप्रिल रोजी रिलीज होणार आहे. सेन्सॉर बोर्डाने या सिनेमाला 'यू' सर्टिफिकेट दिलं आहे.



दरम्यान, इतकंच नाही तर सेन्सॉर बोर्डाने निर्मात्यांना या सिनेमासाठी संशोधनही करण्यास सांगितलं आहे. यावर अनुराग कश्यप चांगलाच भडकलाय. या विषयावर अनुराग कश्यपने सोशल मीडियावर अनेक पोस्ट देखील केल्या आहेत. अनुराग कश्यपने सेन्सॉर बोर्डावर बोलत असताना त्याने सरकारवरही जोरदार टीका केलीये.

अनुराग कश्यपने इन्स्टाग्रामवर लिहिले की, ''धडक २ या सिनेमाच्या स्क्रिनिंगबाबत सेन्सॉर बोर्डाने सांगितलं की, नरेंद्र मोदींनी भारतातील जातीव्यवस्था नष्ट केली आहे. दरम्यान, त्याच आधारावर संतोष हा सिनेमा रिलीज होऊ दिला नव्हता. आता ब्राह्मण फुले या सिनेमावर आक्षेप घेत आहेत. भैय्या जर जातीव्यवस्थाच नष्ट झालीये, तर कशाचे ब्राह्मण? असा सवाल अनुराग कश्यपने उपस्थित केलाय.

तर तुमचा ब्राह्मणवाद अस्तित्वात नाही, कारण मोदीजींनी देशातून जातीव्यवस्था नष्ट केलीये. नाहीतर मग तुम्ही सर्वजण मिळून आम्हाला मूर्ख बनवत आहात. तुम्ही सर्व मिळून निर्णय घ्या की, भारतात जातीवाद अस्तित्वाद आहे की नाही? असंही अनुराग म्हणालाय.

फुले सिनेमाचे दिग्दर्शक अनंत महादेवन काय म्हणाले होते?

अनंत महादेवन म्हणाले होते की, ट्रेलर पाहून लगेच अंदाज काढता येणार नाही चित्रपट कोणाच्या समर्थनात आहे कुणाच्या विरोधात आहे. चित्रपट पाहिल्यावर समजेल किती बॅलन्सिंग चित्रपट आहे. ब्राह्मण समाजाला आम्ही विनंती करतो की तुम्ही चित्रपट पाहा. काही गैरसमज झाले आहेत ते आम्ही क्लिअर करायला तयार आहोत. मला विश्वास आहे चित्रपट पाहिल्यावर ते पण खूश होतील. या चित्रपटात दोन्ही घटकांना समानता दिली आहे. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे शाळा सुरू करू शकले, जेव्हा ब्राह्मणांनी त्यांना जागा दिली. चित्रपटात संपन्नता बॅलन्सिंग दाखवली आहे.

### टाटा रुग्णालयातील डॉक्टरांची कौतुकास्पद कामगिरी!

**मुंबई/प्रतिनिधी :** टाटा रुग्णालयाच्या डॉक्टरांनी ४ वर्षाच्या चिमुकलीला मरणाच्या दारातून परत आणले आहे. हृदयात छिद्र असलेल्या चार वर्षाच्या मुलीला टाटा रुग्णालयातील डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून तिचे प्राण वाचवले आहे. अवघ्या लहान वयात जडलेल्या आजारातून चिमुकलीला बाहेर काढल्यामुळे टाटा रुग्णालयातील डॉक्टरांचे कौतुक केले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कांदिवली येथे राहणाऱ्या मौर्य कुटुंबात २०२१ मध्ये कन्येचं आगमन झालं. परंतु जन्मानंतर अवघ्या १० दिवसांतच तिचा श्वासोच्छवास जलद गतीने होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तिला त्वरित जवळच्या डॉक्टरांकडे नेले. २ डी इको चाचणीने चिमुकलीच्या हृदयात छिद्र असल्याचे निदान झाले. त्यानंतर तिला उपचारांसाठी वाडिया रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या हृदयात आकाराने मोठे, तसेच त्याच्यापर्यंत पोहोचण्यास अवघड असे एक छिद्र आढळले. तिच्या वयोमानासुर या टप्प्यावर खुली शस्त्रक्रिया करणे जोखमीचे होते. त्यामुळे डॉक्टरांनी ती साडेतीन महिन्यांची झाल्यावर तिच्यावर तात्पुरती पीए बँडिंग शस्त्रक्रिया करून हृदयावरील ताण कमी केला. तिच्या हृदयातील छिद्रामुळे तिचे दैनंदिन जगणे अवघड झाले होते. ती फारशी हालचाल न करताही थकायची, तिच्या वयाच्या अन्य मुलांप्रमाणे ती खेळू किंवा धावू शकत नव्हती. तिचा बहुतेक वेळ घरातच जात असे. अन्य मुलांप्रमाणे तिला हसता, खेळता आणि स्वच्छंदपणे जगता येत नसल्याचे मौर्य कुटुंब चिंताग्रस्त होते.

हृदयाला असलेल्या छिद्रामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, वाढ खुंटणे या समस्यांचा चिमुकलीला सामना करावा लागला होता. तिच्या हृदयातील छिद्र बुजविणे आवश्यक होते. पारंपरिक पद्धतीने शस्त्रक्रिया केल्यास रुग्णाला ५ ते ७ दिवस आयसीयूमध्ये निरीक्षणाखाली ठेवावे लागते. वाडिया रुग्णालयातील बालरोग हृदयरोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. बिस्वा पांडा यांच्या नेतृत्वाखाली, डॉ. क्षितिज सेठ आणि डॉ. जैन यांच्या नेतृत्वाखाली कॅथ लॅबमधील डॉक्टरांच्या पथकाने हायब्रिड तंत्राचा वापर करून तिच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. दरम्यान या कामगिरीनंतर टाटा रुग्णालयातील डॉक्टरांचे जगभरातून कौतुक होत आहे.

# अत्याधुनिक साधनांनी पोलिस दल सक्षम करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** पोलिस दलाला परिणामकारक अंमलबजावणीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून वाहने देण्यात येत आहे. येत्या काळातही पोलिसांना अत्याधुनिक साधने देऊन सक्षम करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. कोंडेश्वर येथे अमरावती ग्रामीण पोलिस दलाची कोंडेश्वर येथील निवासस्थान इमारत, प्रशासकीय इमारत, चारचाकी नवीन वाहने, तसेच शहर पोलिसांचे चारचाकी नवीन वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष आणि महिला विसावा कक्षाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे-पाटील, पोलीस महासंचालक (गृहनिर्माण) अर्चना त्यागी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पोलीसांच्या आधुनिकीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे. आधुनिक संसाधनांमुळे नागरिकांच्या सुरक्षितेत भर पडणार आहे. त्यासोबतच पोलीसिंग अधिक गतिमान होईल. आधुनिक साधने पोलिसांनाही सहाय्यभूत ठरणार असल्याने त्यांचे जीवनमान उंचावेल. पोलीस दलात अद्ययावत वाहने दाखल होणे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तसेच पोलिस गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून दर्जेदार घरे बांधण्यात येत आहेत. पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी डीजी लोन स्कीमही सुरू करण्यात आली आहे. नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणाऱ्या पोलीसांनाही उत्तम सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यातील शहर पोलिस दलाचे वातानुकूलित कक्ष, महिला विसावा कक्ष निश्चितच पोलिसांना मदतीचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शहानूर शासकीय निवासस्थान इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच १८ चारचाकी वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. पोलिस कर्मचाऱ्यांना कोंडेश्वर येथील निवासस्थानाची चावी सुपूर्द करण्यात आली.



# अपघातग्रस्त रुग्णांसाठी १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार

**मुंबई/प्रतिनिधी :** रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.




राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला. या बैठकीस आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.दयानंद जगताप, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ.रविंद्र शेटे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मंत्री आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले.

या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री आबिटकर यांनी यावेळी संबंधितांना दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ?प विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान ५ रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी यावेळी सांगितले.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात येणार आहे. आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही आरोग्यमंर्त्याकडून देण्यात आले.

रुग्णालयांना मार्च महिन्यापासून सुमारे १३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे सांगून, यापुढेही आवश्यक निधी वेळोवेळी दिला जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी पूर्ण पारदर्शकपणे केली जावी आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी यावेळी दिले.

### तीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार, शाळेची मान्यता रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** खासगी शाळेमध्ये सहा महिन्यांपूर्वी एका तीन वर्षाच्या चिमुरडीवर बलात्कार झाला होता, त्या शाळेची मान्यता २०२५-२६ या सत्रासाठी नूतनीकरण केली जाणार नाही. जिल्हा शिक्षण केंद्राने मान्यता नूतनीकरणासाठीचा अर्ज नाकारला आहे. यानंतर, रात्री जिल्हाधिकारी कौशलेंद्र विक्रम सिंह यांनी शाळा बंद करण्याचे आदेश दिले. आदेशात असे म्हटले आहे की शाळा २०२००५-२६ या सत्रापासून सुरू राहू शकणार नाही. अशा परिस्थितीत, येथे आधीच शिकणारी मुले सरकारी किंवा इतर खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेऊ शकतात. आरटीई अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या मुलांना इतर सरकारी शाळांमध्ये प्रवेश देता येतो, तर इतर विद्यार्थी स्वत:च्या खर्चाने इतर शाळांमध्ये प्रवेश घेऊ शकतात. हे संपूर्ण प्रकरण भोपाळमधील आहे. या प्रकरणात, डीपीसी ओपी शर्मा म्हणाले की, जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले तेव्हा त्यावेळेस स्थापन केलेल्या समितीने शाळेची मान्यता नूतनीकरण केली जाणार नाही असे म्हटले होते. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला अहवाल पाठवण्यात आला. सरकारने मान्यता नूतनीकरण न करण्याचे आदेशही दिले होते. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश जारी केले. आतापर्यंत सरकारी हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रशासक म्हणून शाळेचे व्यवस्थापन करत होते. शाळा पहिली ते आठवी पर्यत चालते.

१८ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकरण उघडकीस आल्यानंतर दुसऱ्या दिवशी, १९ सप्टेंबर रोजी हिंदू संघटनांनी निदर्शने केली. दरम्यान, शाळा सील करण्यात आली. निदर्शकांमध्ये अभाविप, करणी सेना, संस्कृती बचाव मंचचे कार्यकर्ते आणि नूतन कॉलेजसह काही खाजगी महाविद्यालयांचे विद्यार्थी होते. त्यांची मागणी होती की शाळेची मान्यता रद्द करावी. आरोपी शिक्षक कासिम रेहान (३३) याला फाशी देण्यात यावी.

# रिसोड नगर परिषदेच्या लेखा विभागाचे कामकाज सुरळीत

## लेखा विभागात दि.१८ सप्टेंबर २०२३ पासून कर्मचारी कार्यरत

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील नगर परिषदेच्या लेखा विभागातील मागील काही दिवसापासून लेखा लिपिक हे पद रिक्त होते या विभागात कामाचा ताण असल्यामुळे या पदावर १८ सप्टेंबर २०२३ पासून जहीर अहेमद खान यांना कार्यभार देण्यात आला आहे आहे या विभागातील सर्व कामे सुरळीत पार पडत आहेत.

येथील नगर परिषदेच्या लेखा विभागामध्ये कायमस्वरूपी लेखा लिपिक नसल्यामुळे कार्यालयीन कामांमध्ये अडचणी येत होत्या हे काम सुरळीत पार पाडण्यासाठी या पदावर दिनांक २३ मे २०२३ पासून जहीर अहमद खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे जहीर अहमद खान हे मागील वीस वर्षापासून लेखा विभागाचे कामकाज पहात आहेत लेखा विभागात एकही लिपिक कार्यरत नसल्याने व जाहीर अहमद खान यांना वीस वर्षे अपेक्षा अधिक कालावधी पासून लेखा विभागातील कामकाजाचा अनुभव असल्यामुळे तसेच सध्यालेखा विभागातील अपूर्ण मनुष्यबळ लक्षात घेता कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यामुळे पुढील आदेशापर्यंत जाहीर अहमद खान यांना लेखा लिपिक या पदावर कार्यरत करण्यात आले आहे असा मुख्याधिकारी यांचा दिनांक १८ सप्टेंबर २०२३ चा आदेश आहे या विभागात कोणतेही काम खोळंबले नसून सर्व कामे वेळेत व सुरळीत पार पडत आहेत सदर नगर परिषदेमध्ये कुठल्याही कर्मचाऱ्याला कोठे नियुक्ती द्यावी हे अधिकार वरिष्ठांच्या आदेशाने मुख्याधिकारी यांना आहेत.

> नगरपरिषदे मधील कोणत्या कर्मचाऱ्याला कोणत्या टेबलावर नियुक्त करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना असतात प्रशासन चालवीत असताना अनेक अडचणी येतात सर्वच कर्मचारी सारखे नसल्यामुळे कामात तरबेज व नियमित असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामातील हातखंडा पाहून नियुक्ती करावी लागते
>
> **–सतीश शेवदा मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद रिसोड**

> मी मागील वीस वर्षापासून तारतंत्री या पदावर कार्यरत आहे मुख्याधिकारी यांच्या आदेशाने लेखा विभागातील लेखा लिपिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहे.
>
> **–जहिर अहेमद खान**
> **नगरपरिषद रिसोड.**

# एका वर्षात उद्योगपतींचे १७ लाख कोटी कर्ज माफ

**दैनिक आपला विदर्भ**

## खा. डॉ. अमोल कोल्हे यांचा सत्ताधाऱ्यांवर गणाघात

**मेहकर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने बळीराजासाठी अंदाजे आठ लाख कोटी खर्च केले. तर, एका वर्षात उद्योगपतींचे १७ लाख कोटी कर्ज माफ केले. तेव्हा देश कोणाचा हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. डीजे लावून जयंती साजरी करायची की आसूड काढून साजरी करणार हे ठरवण्याची आता वेळ आली आहे. सणाला उत्सवाचे रूप देणाऱ्यांची गुलामी केली. तर, परिस्थिती बदलणार नाही, असा घणाघात खा.अमोल कोल्हे त्यांनी केला.

मेहकर येथे स्वातंत्र्य मैदानावर ज्योती सावित्री सेवा संघाच्या वतीने छत्रपती श्री शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, ज्यावेळी विचार मांडायचे असतात. तेव्हा गर्दीपेक्षा दर्दी महत्त्वाचे असतात. या मातीने महाराष्ट्राला, बुलढाणा जिल्ह्याला नैतिक अधिष्ठान दिले आहे. तब्बल साडेतीनशे वर्षानंतर ज्यांचे नाव आजही सर्वत्र मोठ्या अभिमानाने घेतले जाते ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या माता राष्ट्रमाता जिजाऊंचा हा जिल्हा आहे. आजचा कार्यक्रम महिलांनी आयोजित केला. याचा आनंद वाटला. मी यासाठी आलो की, आपल्या माता भगिनींना जिजामातेचे मातृत्व, सावित्रीबाईंचे कर्तुत्व व अहिल्याबाई होळकरांचे नेतृत्व असा वारसा लाभलेला आहे. सद्सदविवेक बुद्धीला मुठमाती देणाऱ्या बेधुंद तरुणांची संख्या सध्या वाढत आहे. कर्जमाफी वर सरकार बदलते तेव्हा शेतकऱ्यांचा आसूड हातात घेण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांना शब्द द्यायचा असेल तर, १०० वेळा विचार करा. आपल्याला महापुरुषांच्या जयंत्या डी.जे.वर नाही तर, वैचारिक विचारांवर साऱ्या करायच्या आहेत. विकासाच्या मागे लपले की, पापे धुऊन जातात. एकेकाळी छत्रपती श्री शिवाजी महाराज म्हणायचे की, घरे मोडून विकास होत नाही ते विचार आज कुठे गेले ? हा मेहकर च्या अतिक्रमण हटाव मोहिमे संदर्भात खासदार कोल्हे यांनी टोला लगावला. नोटाबंदी नंतर दहा लाखापेक्षा मध्यम धंदे बंद झाले. मात्र, उद्योगपतींची चांदी होत आहे.



केंद्र सरकारने बळीराजासाठी अंदाजे आठ लाख कोटी खर्च केले. मात्र, एका वर्षात उद्योगपतींचे १७ लाख कोटी कर्ज माफ केले. तेव्हा देश कोणाचा हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. डीजे लावून जयंती साजरी करायची की आसूड काढून साजरी करणार हे ठरवण्याची आता वेळ आली आहे. सणाला उत्सवाचे रूप देणाऱ्यांची गुलामी केली तर, परिस्थिती बदलणार नाही असा घणाघातही त्यांनी केला.सध्या विरोधकांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न सुरू असून एकाधिकारशाही निर्माण करायची आहे. तेव्हा महापुरुषांचे विचार आचरणात आणण्याची गरज निर्माण झाली असून असे झाले, तरच देश महासत्ता होईल असे मत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केले.

# लिंग निदानाचा होता प्रयत्न; वैद्यकीय अधिकारी भासवून महिलेची फसवणूक एक जण अटक

## डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत घटना




**दैनिक आपला विदर्भ**

बुलढाणा: **कायद्याने गुन्हा असताना सुद्धा इतक्ये मोठे धाडस दाखवून नकोसे असलेल्यास बाळाचे गर्भपाताच्या प्रयत्न धक्कादायक प्रकार?डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले शेलगाव देशमुख भागात उघडकीस आला. अत्यंत गंभीर प्रकाराने एकच खळबळ उडाली असून या प्रकाराबाबत मेहकर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक सुनिता देवराव हिवसे यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली असून सदर फिर्यादीवरून आरोपी गजानन विठ्ठल वैद्य रा. माझोड ता. सेनगाव जि. हिंगोली यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये डोणगाव पोलीस स्टेशनला विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

प्राप्त माहितीनुसार मेहकर ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक सुनीता देवराव हिवसे वय ५५ यांनी तक्रार दिली की, जिल्हा शल्यचीक्तीस विभाग बुलढाण PCPNDT विभागस गोपणीय रित्या तक्रार प्राप्त झाली की, मेहकर व डोणगांव विभागात गर्भवती महिलांच्या पोटातील बाळाचे गर्भलींग निदान करतात. प्राप्त माहितीनुसार १७ एप्रिल PCPNDT विभागाला लिगल कॉन्सीलर अड्. वंदना तायडे मोबाइल फोन वरुन तक्रारदार यांना गोपनीय माहिती मिळाली की,१७ एप्रिल रोजी डोणगांव परिसरात गर्भलींगदान करण्यात येणार आहे. त्या अनुशंगाने PCPNDT विभागाने एक केस तयार केली व नंतर संतोष नारायन माळोदे, अड्. वंदना तायडे, ज्ञानेश्वर मुळे, व पंच गजानन रघुनाथ शेवाळेसह आम्ही मेहकर येथे आलो व नंतर आम्ही (डमी केस) घेऊन कुकसा फाटा येथे आलो व तेथे गोपणीय तक्रार भेटला व तेथे एम.एच.४९ ए.एस.६९६६ या क्रमांकाच्या गाडी पाठलाग केला व त्यांना शेलगाव देशमुख पर्यंत आलो, असता व सदर गाडी परत आली व सदर गाडी आम्ही थांबवीली. त्यामध्ये दोन महिला आल्या होत्या. त्यांची चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही गजानन विठ्ठल वैद्य रा. माझोड ता. सेनगाव जि.हिंगोली यांनी आम्हाला शेलागाव देशमुख येथेच फिरवा फिरव केली व एका महिलेने २८ हजार रुपये गजानन विठ्ठल वैद्य याच्याकडे दिले व म्हणाला की मीच डॉक्टर आहे व दुसरे डॉक्टर गर्भलींग निदान करतो व मी नंतर गर्भपात करतो. व तुम्ही सदर रक्कम डॉक्टरला द्या नंतर पैसे गजानन विठ्ठल वैदय याने घेतले होते. तेथुन गजानन विठ्ठल वैद्य याच्या गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये १. 1.NULIFE Tripal Safety चे चार ग्लोज नग, ब ल ड



क ले क्श न बाटल ५ नग, DYNAPAR AQ इंजेक्शन सीरीज १० नग, डीस्पोव्हन सीरींज २.५ ML २ नग, नगदी २०० रुपयांच्या ४५ नोटा ९ हजार रुपये व नगदी ५०० रुपयांच्या ३८ नोटा १९ हजार रुपये असे एकुण २८ हजार रुपये आरोपी गजानन विठ्ठल वैदय याच्या पॅन्टचे खिशा मधुन मिळुन आले.सदर आरोपी गजानन विठ्ठल वैद्य याने गर्भलींगदान केल्यानंतर तुम्हाला अ पे क्षि त नसलेल गर्भ मी गर्भपात करुन देइल असे म्हणुन महिलांची फसवणुक केली आहे. सदर व्यक्ती हा वैद्यकीय अधिकारी नसतांना वैद्यकीय अधिकारी भासउन फसवणूक केली आहे. तरी सदर आरोपीवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी फिर्याद दिली. सदर फिर्यादीवरून डोणगाव पोलिस स्टेशनचे पोहेका संजय घिके यांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय अशोक गाढवे करीत आहेत.

## विविध वृत्त...

### १० मे रोजी जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालत

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** १० मे रोजी जिल्हा सत्र न्यायालय,वाशीम आणि सर्व तालुका न्यायालयामध्ये सकाळी १०:३० ते संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये दाखलपुर्व व प्रलंबित प्रकरणे सुनावणीसाठी ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगाराचे वाद, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे (आपसात तडजोड करण्याजोगे प्रकरणे वगळून), आपसात तडजोड करण्याजोगे फौजदारी प्रकरणे,मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद,भु-संपादन प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे,मनाई हुकुमाचे दावे,विशिष्ट पुर्वबंध कराराची पूर्तता विषयक वाद या प्रकरणांचा समावेश असणार आहे.

ज्या पक्षकारांची वर नमुद प्रकारची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असतील किंवा खटलापूर्व प्रकरणे न्यायालयात दाखल आहेत,त्यांनी १० मे रोजी आपली प्रकरणे आपसात करण्यासाठी या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सहभाग नोदविण्याकरीता संबंधित न्यायालय, तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशीम यांच्याशी संपर्क साधावा.या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत.असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही.हांडे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विजय टेकवाणी यांनी केले आहे.

### मुंबई मेट्रो ३ च्या गाड्यांचा आज लेट मार्क!

**मुंबई/प्रतिनिधी :** मेट्रो ३ ने प्रवास करत असाल तर आज वेळापत्रक पाहूनच प्रवास करा. सकाळी साडेसहाला सुरू होणारी सेवा आज ८:३० च्या सुमारास सुरु झाली आहे. ही मेट्रो सेवा आज रात्री साडेदहापर्यंत सुरू राहणार आहे. त्यानुसार प्रवाशांनी आपल्या प्रवासाचं नियोजन करावं, असं आवाहन मुंबई मेट्रोकडून करण्यात आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई मेट्रो ३ वरील सेवा आज सकाळच्या सुमारास उशिराने सुरु झाली. नेहमी सकाळी साडेसहाला सुरू होणारी सेवा आज ८:३० च्या सुमारास सुरु झाली. 'कुलाबा – वांद्रे – सीप्झ (आरे) भुयारी मेट्रो ३' मार्गिकेवरील आरे – बीकेसी टप्पा कार्यान्वित झाल्यानंतर आता अगदी काही दिवसातच बीकेसी – आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानक दरम्यानचा २ अ टप्पा वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. या टप्प्याच्या संचलनाच्यादृष्टीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आणखी एक पाऊल पुढे उचलले आहे.

एमएमआरसीकडून आरे – बीकेसी आणि बीकेसी – आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकांदरम्यानच्या एकत्रित चाचण्यांना सुरुवात करण्यात आली. या चाचण्यांसाठी आरे – बीकेसी मार्गिकेवरील गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आज (दि १८) रोजी तांत्रिक कारणामुळे मेट्रो-३ च्या सेवा सकाळी ८.३० ते रात्री १०.३० पर्यंत उपलब्ध असतील'', अशी एक्स पोस्ट मुंबई मेट्रो ३ च्या अधिकृत एक्स खात्यावरून करण्यात आली आहे.

### आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर एऊची मोठी कारवाई, ८०० कोटींची संपत्ती जप्त, नेमकं प्रकरण काय?

**मुंबई/प्रतिनिधी :** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद युनिटने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. जगन मोहन रेड्डी यांची २७.५ कोटी रुपयांची शेअर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. यासोबतच दालमिया सिमेंट्स भारत लिमिटेड ची ३७७.२ कोटी रुपयांची जमीनही जप्त करण्यात आली आहे. ही बाब 'क्विड प्रो क्वो' गुंतवणुकीशी संबंधित आहे.

ऍ ने दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मालमत्तेची एकूण किंमत ७९३.३ कोटी रुपये आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर १४ वर्षांनी ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) २०११ मध्ये नोंदवलेल्या जुन्या प्रकरणाच्या आधारे ईडीने ही कारवाई केली आहे. त्या प्रकरणात डीसीबीएलने भारती सिमेंट कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणूक केली होती. जगन मोहन रेड्डी यांचे कार्मेल एशिया होल्डिंग्स लिमिटेड, सरस्वती पॉवर अँड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि हर्षा फर्ममधील शेअर्स जप्त करण्यात आले आहेत. ऍ ला हा जप्तीचा आदेश १५ एप्रिल २०२५ रोजी मिळाला होता, तर ३१ मार्च रोजीच हा आदेश जारी करण्यात आला होता. जमिनीची प्रारंभिक खरेदी किंमत ३७७ कोटी रुपये होती.

मिळालेल्या माहितीनुसार, २०१३ मध्ये सीबीआयने वाय.एस. जगन मोहन रेड्डी, डीसीबीएल आणि इतर काही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्यावर भारतीय कायदे आणि भ्रष्टाचाराशी संबंधित नियमांनुसार आरोप ठेवण्यात आले होते. या प्रकरणात ईश्वर सिमेंट्सची खाण जमीन ऍ कडे हस्तांतरित केल्याचाही समावेश आहे. तपास यंत्रणांचे म्हणणे आहे की जगन रेड्डी, त्याचे जवळचे सहकारी व्ही. विजया साई रेड्डी (जे ऑडिटर आणि म ाजी खासदार आहेत) आणि ऍ चे पुनित दालमिया यांनी रघुराम सिमेंट लिमिटेडमधील त्यांचे शेअर्स झ्अींइघ्ण्घ्ध् या फ्रेंच कंपनीला विकण्याचा करार केला होता. हा सौदा १३५ कोटी रुपयांना झाला होता. यातील ५५ कोटी रुपये जगन रेड्डी यांना हवालाद्वारे रोख स्वरूपात देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. हे व्यवहार १६ मे २०१० ते १३ जून २०११ दरम्यान झाले. दिल्लीत जप्त करण्यात आलेल्या काही कागदपत्रांवरून आयकर विभागाला या पैशांची माहिती मिळाली.

## शेतकऱ्यांनो फार्मर आयडी बनवला नसेल तर लगेच बनवून घ्या !

### कृषी योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी अनिवार्य

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/जिमाका :** केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी १५ एप्रिलपासून अनिवार्य करण्यात आले आहे. आतापर्यंत ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवून घेतले नाही त्यांनी आपल्या जवळच्या




सीएससी केंद्रावर नोंदणी करुन शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी बनवून कृषी योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

फार्मर आयडी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येणार असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरीत करणे सुलभ होईल. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. शेतकरी ओळख पत्र क्रमांक १५ एप्रिल २०२५ अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबतचे शासननिर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी सातबारा आधारला लिंक करायचा आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३ लाख ४७ हजार २१३ शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी तयार करुन वितरीत करण्यात आले आहे.

आ य ड ी बनवण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक जो आधार व बँक खात्याशी लिंक व सातबारा किंवा नमुना ८ या कागदपत्राची आवश्यक आहे. ही कागदपत्रे घेवून आपल्या जवळच्या नागरी सुविधा केंद्र (सीएससी), ग्राम कृषि विकास समिती येथे नोंदणी करावी. फार्मर आयडी बनवला नाही तर कृषी योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळख क्रमांक बनवून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पर्यटकांनो 'या' महामार्गावरुन प्रवास करत असाल तर आधी ही बातमी वाचा

**पुणे/प्रतिनिधी :** पर्यटकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबई – पुणे महामार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमंडली आहे. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतूककोंडीत प्रवाशांचे हाल होत आहे.

लागोपाठ आलेल्या सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात मुंबईकर पर्यटक पर्यटन स्थळांवर जाण्यास निघाल्याने मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर पहाटेपासून वाहतूक कोंडी झाली आहे. खंडाळा घाट परिसरामध्ये साधारणत: सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा केल्याने मुंबई पुणे महामार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमंडली आहे.

त्यामुळे गुड फ्रायडेच्या सुट्टीला जोडूनच शनिवार आणि रविवार आल्याने सलग तीन दिवसीय सुट्ट्यांचा आनंद

## संजय गांधी मार्केट जवळील भंगार दुकानाला लागली भीषण आग



**दैनिक आपला विदर्भ**

**■ मनोज गोरे**

**चंद्रपूर :** चंद्रपूर उन्हाच्या तडाख्याने सध्या तापत आहे, तापमान ४२ डिग्री सेल्सिअस च्या वर गेल्याने नागरिक घराबाहेर पडत नाही आहे, मात्र आज चंद्रपूर-नागपूर मार्गावरील संजय गांधी मार्केटच्या मागील भागात असलेल्या भंगार दुकानातील काही साहित्य जाळल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. या आगीचा विळखा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वसाहती जवळ पोहचल्याने स्थानिक नागरिकांनी एका घराचे कुलूप तोडत सिलेंडर बाहेर काढले. नागरिकांनी याबाबत अग्निशमन विभागाला सूचित केले. यानंतर अग्निशमन विभागाने तात्काळ आगीवर नियंत्रण आणले.

## सामाजिक बांधिलकी जोपासत बाबासाहेबांना अभिवादन

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आगळीवेगळी जयंती साजरी

**दैनिक आपला विदर्भ**

रांजणगाव : संपूर्ण आयुष्य गोरगरीब दीनदुबळ्यासाठी खर्ची करणाऱ्या बाबासाहेबांमुळे आज प्रत्येक समाजातील घटकाला सन्मानाचे दिवस आले आहेत.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाची रुजवन केलेल्या डॉक्टर बाबासाहेबांना अपेक्षित असलेला समाज घडावा त्यांच्या स्वप्नातील देश निर्माण व्हावा यासाठी छोट्याशा कार्याला प्रारंभ करत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यावर्षी रांजणगाव औद्योगिक क्षेत्रात एक आगळीवेगळी आणि समाजोपयोगी पद्धतीने साजरी करण्यात आली. 'जयंती नाचून नाही तर वाचून साजरी व्हावी' या विचारातून प्रेरित होऊन विविध जातीधर्मातील समाजबांधवांनी एकत्र येऊन सामाजिक बांधिलकी जोपासणारा उपक्रम राबविला. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने ''द मदर ग्लोबल फाउंडेशन, पुणे'' संचालित श्री. मनःशांती छात्रालय, शिरूर येथील अनाथ बालकांना तीस हजार रुपयांचा किराणा व नाश्त्याचे साहित्य देण्यात आले. सामाजिक जाणीव आणि महापुरुषांचे विचार कृतीत उतरविण्याचा हा प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरला. या उपक्रमात शिरूर ग्रामीणचे आदर्श सरपंच पुरस्कार विजेते अरुण घावटे पाटील, प्रथम लोकनियुक्त सरपंच विठ्ठल शेठ घावटे पाटील, तसेच शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.अठरापगड जातीधर्मातील तरुणांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले.

महापुरुषांच्या जयंती निमित्त केवळ उत्सव नव्हे, तर त्यांच्या विचारांचा प्रसार आणि समाजातील दुर्बल घटकांची सेवा हा या उपक्रमाचा मूळ उद्देश होता. त्यामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, ही जयंती खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरली आहे.





### सामाजिक बांधिलकीचे दर्शन

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती ही नाचून नव्हे तर वाचून साजरी करावी या उद्देशानेद मदर ग्लोबल फाउंडेशन, पुणे'' संचालित श्री. मनःशांती छात्रालय, शिरूर येथील अनाथ बालकांना तीस हजार रुपयांचा किराणा व नाश्त्याचे साहित्य देण्यात आले. सदर कार्यक्रमात विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून सामाजिक बांधिलकी जोपासली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेला देश घडविण्यासाठी सुरू केलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वांकडून कौतुकांचा होत आहे.